Registered with the Registrar of News-papers for India No. MH/52



श्री साईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत नियतकालिक
सप्टेंबर–ऑक्टोबर १९९८ / रुपये १२

# श्री साईलीला

संपादक : द. म. सुकथनकर
कार्यकारी संपादक : विद्याधर ताठे



॥ दसरा विशेषांक ॥

# गुरुपौर्णिमा उत्सव शिर्डी



श्री साईसच्चरित पोथी, बाबांचा फोटो आणि वीणा घेऊन, संस्थानच्या विश्वस्तांनी, गुरुपौर्णिमा उत्सवानिमित्त समाधी मंदिर ते द्वारकामाई अशी प्रथेप्रमाणे मिरवणूक काढली.



द्वारकामाईमध्ये श्रीसाईचरित पोथीच्या अखंड पारायणाचा श्रीगणेशा संस्थानचे अध्यक्ष श्री. द. म. सुकथनकर यांनी केला.



मिरवणुकीतील एक दृश्य



उत्सवानिमित्त श्रीसाईपादुकांची पूजा करताना विश्वस्त श्री. संभाजीराव काळे आणि श्री राजीव रोहोम




श्री साईबाबांपुढे उत्सवात विविध कार्यक्रम होतात. प्रसिद्ध गायिका सौ. माधवी नानल यांच्या मैफलीचे एक दृश्य

श्री साईबाबा संस्थान शिरडीचे अधिकृत नियतकालिक

# श्री साईलीला



## दसरा विशेषांक

: संपादक :

द. म. सुकथनकर

: कार्यकारी संपादक :

विद्याधर ताठे

कार्यालय : 'साईनिकेतन', ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई – ४०० ०१४.
दूरध्वनी : ४१६ ६५ ५६ फॅक्स : (०२२) ४१५ ०७ ९८

: मुद्रक : गीता ऑफसेट, वडाळा, मुंबई.

: टाईपसेटींग : देवयानी एन्टरप्रायझेस, दादर.

: मुखपृष्ठ : हरेश जाधव

वार्षिक वर्गणी रु. ५०/- आजीव सभासद वर्गणी : रु. १०००/-
परदेशाकरिता वार्षिक वर्गणी : रु. १०००/- (टपाल खर्चासहित)

द. म. सुकथनकर, अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान, शिरडी
यांनी हे नियतकालिक, 'साईनिकेतन', ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई – ४०० ०१४ येथे छापून प्रसिद्ध केले आहे.

या नियतकालिकातील लेखांत प्रसिद्ध झालेली मते ही त्या लेखातील लेखकांची स्वतंत्र मते असून
त्या मताशी संपादक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

सप्टेंबर-ऑक्टोबर १९९८



# श्री साईबाबा संस्थान शिरडी

## विश्वस्त मंडळ

श्री. द. म. सुकथनकर
(अध्यक्ष)

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. मोहन मो. जयकर | (सदस्य) | श्री. रायभान ग. चिने | (सदस्य) |
| श्री. रमेश दा. सोनी | " | श्री. भास्कर शं. बोरावके | " |
| श्रीमती रेखा ग. दिघे | " | श्री. अण्णासाहेब सा. म्हस्के पाटील | " |
| श्री. प्रकाश व. कारखानीस | " | श्री. राजीव पुं. रोहोम | " |
| श्री. मुकेश र. पटेल | " | श्री. संभाजी कि. काळे | " |
| श्री. मधुकर द. जोशी | " | श्री. अशोक भि. खांबेकर | " |
| श्री. प्रकाश प्र. वैशंपायन | " | सौ. प्रेमाबाई सो. बज | " |
| श्री. मधुकर ज. गर्दे पाटील | " | श्री. रामचंद्र नि. गोसावी | " |
| श्री. देवकीनंदन शं. सारस्वत | " | श्री. प्रभाकर तु. बोरावके | " |
| श्री. आप्पासाहेब खं. कोते | " | श्री. सोपान मा. धोर्डे | " |

कार्यकारी अधिकारी : श्री. अजित पवार


# अंतरंग


| | |
|---|---|
| ❑ **संपादकीय** : विद्याधर ताठे | ४ |
| ❑ **गुरुभक्ती** : स्वामी जयेंद्र सरस्वती | ६ |
| ❑ **नामस्मरणाचे महत्त्व** : नामदेव नाझरे | ९ |
| ❑ **आगळे-वेगळे सद्‌गुरु श्री साईबाबा** : प्राचार्य कुलकर्णी | १० |
| ❑ **चला लुटूया साईखजिना** : साईसेविका | २१ |
| ❑ **माहूरची श्रीरेणुका** : डॉ. अशोक कामत | २४ |
| ❑ **तुळशीची माळ** : डॉ. नरेंद्र कुंटे | २७ |
| ❑ **वचनपूर्ती** : भालचंद्र गन्द्रे | २९ |
| ❑ **श्री साईदर्शन** : कृष्णा तेली | ३० |
| ❑ **ज्ञानेश्वरी नित्यपाठ** : एस. ए. कुलकर्णी | ३२ |
| ❑ **दत्तावतारी संत शंकरमहाराज** : गजानन कुलकर्णी | ४१ |
| ❑ **संत : कालोचित धर्मसंस्थापक** : डॉ. सौ. सुनंदा खेरडे | ४८ |
| ❑ **श्रीमद् भगवद्‌गीतेची महती** : ह. ल. रानडे | ५३ |
| ❑ **श्री साईवंदना (कविता, गीत, अभंग)** | ६१ |
| ❑ **साईउवाच (अध्याय ७-८)** : संग्राहक : प्र. का. सोमण | ६८ |
| ❑ **ग्रंथ परिचय** : सौ. भारती देशमुख | ७२ |
| ❑ **सुभाषितम्** : सु. ह. जोशी | ७३ |
| ❑ **शिरडी वृत्त** : | ७७ |
| ❑ **संस्थान प्रकाशित पुस्तकांची यादी** : | ७८ |
| ❑ **आवाहन** : | ७९ |


**श्री साईलीला**



**दसरा विशेषांक**



श्री साईलीला



दसरा विशेषांक



# संपादकीय

**साधुसंत येती घरा।**
**तोचि दिवाळी दसरा।**

असे संतवचन महाराष्ट्रात सर्वमुखी आहे. या संतवचनातून आपणास दिवाळी व दसरा या सणांचेही मोठेपण दिसून येते. आदिशक्तीच्या उपासनेचा नवरात्र महोत्सव त्यानंतर येणारा दसऱ्याचा-सिमोल्लंघनाचा सुवर्णदिन याचे भारतीय जनमनात एक आगळेवेगळे स्थान आहे. श्री साईभक्तांना मात्र दसऱ्याचे महत्व यापेक्षाही थोडे अधिक आहे. कारण दसरा हा श्री साईबाबांच्या अवतारकार्याचा समाधी दिन; बाबांचा पुण्यस्मरण दिन !

**मैली चादर ओढके कैसे द्वार तुम्हारे आऊ !**

असे देवाद्वारी - मंदिरी जाताना अनेकांच्या मनांत येते व त्यांचे मन खिन्न-उदास होते. आपणच केलेल्या अकर्माच्या अपराधाची भक्तांस जाणीव होते व त्यांच्या ओठी वरील शब्द येतात. पण साई ही सर्व भक्तांची माऊली आहे. त्या विश्वमाऊलीचा दरबार सर्वांसाठी खुला आहे. ना जात - ना वर्ण, ना धर्म - ना कर्म, ना रूप - ना रंग तेथे कोणताही भेद नाही. आपपर दुजाभाव नाही. गरीब-श्रीमंतीचा वर्गभेद नाही. माऊलीच्या ममतेने भक्तांच्या दोषांकडे दुर्लक्ष करून साईमाऊली साईभक्तांना आपल्या कवेत घेते व त्याचे मनोरथ पूर्ण करते. म्हणून 'साई दरबार'चे वर्णन करताना भक्त म्हणतात -

**झोलीयाँ भर गयी, कोई खाली न गया।**
**होके मासूम तेरे दरसे कोई न गया।**

श्री साईबाबांचा महिमा वर्णन करावा तेव्हढा थोडा आहे. बाबांच्या निर्वाणास - समाधीस आज ८० वर्षे पूर्ण होत आहेत. या ८० वर्षांत बाबांचा महिमा सदैव वृद्धिंगतच होत गेलेला आहे. केवळ भारतातच नव्हे तर विदेशामध्येही साईबाबांची मंदिरं उभी केली गेली आहेत. आजही अनेक संस्था साईबाबांच्या नावाने निघत आहेत. अनेक कवींना बाबांपासून प्रेरणा लाभत आहे. अनेकांच्या संकटसमयी बाबा संकटविमोचक बनून धावत येत आहेत. आबालवृद्धांना साईभक्तीची येणारी प्रचिती पाहून साईंच्याच -

**जरी हे शरीर गेलो मी टाकून।**
**तरी मी धावेन भक्तासाठी॥**

श्री साईलीला



दसरा विशेषांक

या वचनांची सत्यता अनुभवास येत आहे. अशा या साईमाऊलीच्या अगाध, अतर्क्य महिम्याबद्दल शब्दांच्या मर्यादित साधनाने सांगता येणे अवघड नव्हे तर अशक्यच आहे. 'श्री साईलीला'च्या प्रस्तुत दसरा विशेषांकाचे प्रकाशन हे गंगेच्या पाण्याने गंगेलाच अर्घ्य देण्यासारखे आहे. या सर्व कार्याच्या यशामागे श्री साईबाबांचीच असीम कृपा आहे. साईकृपेने प्रज्वलित झालेला एक ज्ञानदीप म्हणजेच 'श्री साईलीला' होय ! शुद्ध, सात्विक भक्तीप्रचाराच्या हेतूने सुरू झालेल्या 'श्री साईलीला'चा प्रस्तुत अंक त्या वाटेवरील एक पुढचे पाऊल आहे. आपण साईभक्तांनी ही सेवा प्रेमळपणे रुजू करून घ्यावी ही प्रार्थना.


या दसरा विशेषांकाचे काम शेवटच्या टप्प्यात असतानाच, पुण्याचे साईभक्त **ले. कर्नल मु. ब. निंबाळकर** यांचे दुःखद निधन (दि. २४ ऑगस्ट ९८) झाल्याचे वृत्त कानी आले आणि श्री साईलीलाचा एक खंदा लेखक गेल्याने मन उदासीन झाले. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो ही साईचरणी प्रार्थना !

हे संपादकीय लिहून पूर्ण करीत असतानाच एक वृत्त मला पत्राद्वारे कळाले असून 'श्री साईलीला' वाचकांना ते वृत्त ऐकून आनंद वाटेल असे वाटते. ते वृत्त म्हणजे 'श्री साईलीला'चे नामवंत लेखक श्री. गजाननराव कुलकर्णी (रत्नागिरी) यांना कोकण मराठी साहित्य परिषदेचा यंदाचा उत्कृष्ट काव्याचा **'सावंत पुरस्कार'** मिळालेला आहे. श्री. कुलकर्णी यांची अनेक काव्यपुष्पे श्री साईलीलातून प्रकाशित झालेली आहेत. प्रस्तुत अंकात दत्तयोगी श्री शंकरमहाराज यांच्यावर त्यांनी लिहिलेला कादंबरीवजा ललितलेख आम्ही दिलेला आहे. श्री. कुलकर्णी यांचे सानंद अभिनंदन !

प्रस्तुत अंकात, शिरडी संस्थानचे नवे कार्यकारी अधिकारी श्री. अजितराव पवार यांचा परिचय आम्ही दिलेला आहे. नव्या कार्यकारी अधिकाऱ्यांशी झालेला वार्तालाप आम्ही वाचकांसाठी पुढील अंकात प्रसिद्ध करीत आहोत.

श्री साईबाबांचे पुण्यतिथीनिमित्त वंदन करून या संपादकीयास पूर्णविराम देतो.

**विद्याधर ताठे**
कार्यकारी संपादक, श्री साईलीला



# गुरुभक्ती

– स्वामी जयेंद्र सरस्वती

❖❖❖

गुरु महात्म्याबद्दल लिहावे तेव्हढे थोडे आहे. आपला मागील अंक गुरुपौर्णिमा विशेषांकच होता. त्यातीलच एक महत्वपूर्ण लेख, जो अंकात समाविष्ट झालेला नव्हता, इथे प्रसिद्ध करीत आहोत. कांची कामकोटी पिठाधिपती महास्वामीजी जयेंद्र सरस्वती जी यांनी आपल्या गुरुचा केलेला हा शब्दगौरव.

❖❖❖



ईश्वरापेक्षाही गुरु माऊली श्रेष्ठ आहे. ईश्वरभक्तीपेक्षाही गुरुभक्ती उत्तम आणि प्रशंसनीय आहे. याचे कारण ईश्वरास कोणी प्रत्यक्ष पाहिले नाही. परंतु श्रीगुरु आपणामध्येच असून आपणांस प्रत्यक्ष दिसतात. गुरुंचे दर्शन सुलभ आणि वर्णनातील व आनंददायी आहे. निष्कलंक, सर्वज्ञ, स्थितप्रज्ञ, निर्भय आणि प्रबल असे गुरु आपणांस लाभले, तर ज्या मन:शांतीसाठी आपण ईश्वराची प्रार्थना करतो, ती मन:शांती गुरुभक्तीमुळे प्राप्त होईल आणि म्हणून गुरुस्तुतीपर श्लोक -

**गुरुब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः ।**
**गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ॥**

हा सर्वमान्य आणि सार्थ (योग्य) आहे.

गुरु म्हणजेच ब्रह्मा, विष्णु आणि महेश आहेत. त्यांना आमचा नमस्कार असो !

वरील श्लोकाचे असे वैशिष्ट्य आहे की, यामध्ये गुरु आणि

ब्रह्म हे एकच आहेत, हे विशद केले आहे. शिवाय श्लोकाचा अर्थ शिव व विष्णु हे एकच आहेत. आणि म्हणूनच या श्लोकाचा उच्चार करून मनोभावे गुरुंना साष्टांग नमस्कार घातल्यानंतर मनोमन खात्री पटते की हरि आणि हर एकच आहेत.

ईश्वर विश्वाची निर्मिती आणि संरक्षण करतो, परंतु गुरुंच्यावर ती जबाबदारी नाही. ईश्वरास ही कामे करण्यासाठी ऑफिस (कार्यालय) असते, परंतु गुरुंच्यावर जबाबदारी नसल्यामुळे कार्यालयाची आवश्यकता नसते. यास्तव सर्वाधिकारी ईश्वराकडून त्याच्या कार्यात व्यत्यय आणून मन:कामना पूर्ण करून घेण्यापेक्षा गुरुंचेकडून पूर्ण करून घेणे सोपे आहे.

ईश्वराचे ठिकाणी असणारे पावित्र्य, निष्कलंकत्व, सत्य, प्रामाणिकपणा, संपूर्ण ज्ञान, अपार करुणा/दया आणि स्थितप्रज्ञता हे सर्व गुरुंचे ठायीही असतात, परंतु फरक एवढाच की, ईश्वर आपणास दिसत नाही तर गुरुंचे वास्तव्य आपणामध्ये असल्याने त्यांच्या दर्शनाचा लाभ आणि परमानंद आपणास मिळतो.

भक्तीभावाने आणि दृढ श्रद्धेने गुरुचरणी लीन झाल्यानंतर जे इच्छित ईश्वराकडून कष्टसाध्य होणारे आहे ते गुरुकृपेने विनासायास साध्य होईल. म्हणूनच ईश्वरभक्तीपेक्षा गुरुभक्ती श्रेष्ठ आहे, असे गुरुजनांनी आणि मान्यवर वडीलधाऱ्यांनी म्हटले आहे. परंतु याचा अर्थ मात्र असा नव्हे की, आपणास ईश्वराची आवश्यकता नाही व त्याचे विस्मरण व्हावे, कारण ईश्वरकृपेने तर आपणास गुरुंची प्राप्ती होते. त्याची कृपा नसेल तर गुरुंच्या सानिध्याचा आणि कृपेचा लाभ आपणास होणारच नाही.

आद्य शंकराचार्यांनी आपल्या विवेकचूडामणी काव्यात म्हटले आहे की, परमेश्वराच्या कृपेशिवाय तीन गोष्टी प्राप्त होणार नाहीत, दुर्लभ आहेत, त्या अशा:-

१) मानवाचा जन्म होणे.

२) सत्य (अंतिम सत्य) जाणून घेण्याची इच्छा होणे.

३) पूज्य सद्‌गुरुंची प्राप्ती होणे.

**दुर्लभं त्रयमेवैतद् देवानुग्रह हेतुकम् ।**
**मनुष्यत्वं मुमुक्षत्वं – पुरुषसंग्रह: ॥**

दक्षिणमूर्ती हे सर्वांचे गुरु आहेत.

**'स सर्वेषामपि गुरु: कालेनानवच्छेदात् ।'**

एका गुरुंकडून दुसऱ्या गुरुंकडे आणि क्रमश: तिसऱ्याकडे, याप्रमाणे ज्ञान प्रदान कसे झाले असेल याचा शोध घेत आपण मागे-मागे गेलो तर असे लक्षात येईल की ईश्वर स्वत:च त्याचे शिष्याचे गुरु होत. यास्तव आपण परमेश्वरास कदापि विसरु नये.

या विषयाचे संदर्भात दुसरी विचारप्रणाली अशी आहे-

ईश्वर आणि गुरु असे दोन भिन्न नसून ते एकच आहेत, आणि ईश्वर गुरुरुपात अवतरले आहेत, अशी आपली दृढ श्रद्धा असेल तर गुरुभक्ती म्हणजेच ईश्वरभक्ती वेगवेगळी करण्याची आवश्यकता नाही. गुरुभक्ती हीच ईश्वरभक्ती होय. गुरुंना आपण पूर्णतया शरण जाऊया! ईश्वरानेच गुरुंचा अवतार घेतला असल्याने जीवनात गुरु आपले रक्षण करतील. आरंभी उल्लेख केल्याप्रमाणे गुरु हेच ब्रह्मा, विष्णु आणि महेश या तीन देवांचे अवतार आहेत.

**गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु: गुरुर्देवो महेश्वर:**

वरील श्लोकाचे स्पष्टीकरण कित्येकदा ब्रह्मज्ञानाचे/ब्रह्मविद्येचे परमश्रेष्ठ गुरु श्री व्यास महर्षि यांचे संदर्भात केले जाते.

**अचतुर्वदनो ब्रह्मा द्विबाहुरपरो हरि: ।**
**अभाल लोचन: शंभु: भगवान बादरायण: ॥**

महर्षि व्यासमुनींना बादरायण असेही म्हणतात. ते चतुर्भुजरहित ब्रह्मा आहेत, दोन बाहू असलेले श्रीविष्णु आहेत, आणि भाळी तृतीय नेत्र असलेले महेश आहेत. श्री व्यासमहर्षीचे असे श्रेष्ठत्व आहे. ते चिरंजीव आहेत...

**'अश्वत्थामा बलिर्व्यासो हनुमन्त च विभीषण: ।**
**कृप: परशुरामश्च सप्तैते चिरंजीविन: ॥**

गुरुंशिवाय अन्य कोणीही श्रेष्ठ नाही. गुरुंवर आपला पूर्णतया, दृढ विश्वास हवा. ईश्वरच गुरुरुपात अवतरले आहेत, अशी आपली दृढ श्रद्धा असेल तर वेगळ्या ईश्वरभक्तीची आवश्यकता नाही. गुरुंप्रती असलेला दृढ विश्वास, श्रद्धा आणि अपार भक्ती यामुळे ईश्वरप्राप्ती होऊन मुक्ती मिळेल. वैष्णवजनांना गुरुभक्ती ही अत्यंत महत्त्वाची आणि प्रामुख्याने आवश्यक आहे. आणि म्हणून आपल्या पवित्र धर्मग्रंथांत गुरुभक्ती करावी, असा संदेश आहे. गुरु परिपूर्ण नसले तरी अध्यात्म मार्गदर्शनासाठी गुरु निवडावा आणि मनोभावे त्यांची उपासना, भक्ती करावी. गुरुंचे माध्यमातून ईश्वरोपासना आपोआपच होते.

ईश्वराची किंवा गुरुंची भक्तीभावाने उपासना केली असतां त्यांना काहीच लाभ होत नाही (कारण ते तर निरिच्छच आहेत.) परंतु आपला मात्र फायदा निश्चितच होतो. तो कसा तर-

आपणामध्ये दोष असतात. आणि मन नेहमी चंचल असते. आपले मन एक क्षणभरही एके ठिकाणी स्थिर रहात नाही. शुद्ध पवित्र, सर्वज्ञ, आणि एखाद्या शुष्क काष्ठाप्रमाणे जो ताठ आणि निश्चयी आहे अशा गुरुंप्रती आपले चित्त स्थिर झाले तर आपणही त्यांच्याप्रमाणे स्थितप्रज्ञ होऊ शकू. यासाठी आपल्या विचाराचा केंद्रबिंदू ईश्वरच असावा असे नाही तर गुरुमाऊली प्रमाणेच अध्यात्माचे मार्गदर्शन करणारी त्या मार्गातील श्रेष्ठ अधिकारी व्यक्तीही असू शकेल. त्यांच्याशी आपण एकरुप झाल्यानंतर, भटकणारे आपले चंचल मन स्थिर होईल, निश्चयी होईल, आपणास आत्मज्ञान होईल आणि चिदानंदाचा प्रत्यय आपणास येईल.

खऱ्या ज्ञानाची प्राप्ती गुरुंचे आशीर्वादाने आणि कृपेनेच होते, असे छांदोग्य उपनिषदात सांगितले आहे.

**''आचार्यवान् गुरुषो वेद: ।''**

ही कल्पना छोट्या बोधकथेत याप्रमाणे विशद केली आहे:-

''गांधार (आताचे कंदहार) मधील एका मनुष्याचे काही डाकूंनी अपहरण केले. त्याच्या डोळ्यावर पट्टी बांधून त्यास घनदाट अरण्यात सोडून दिले गेले. आपण कोठे आहोत हे माहित नसल्याने, अरण्यातून बाहेर पडण्याचा मार्ग माहित नाही अशा चमत्कारिक अवस्थेत सापडल्यावर तो बिचारा आपल्या गांधार देशी परत कसा जाणार?''

आपली परिस्थितीही वरील गोष्टीतील डोळ्यावर पट्टी बांधलेल्या मनुष्यासारखीच आहे.

आपणावर असलेल्या मायेच्या प्रभुत्वामुळे आपली स्थितीही पट्टी बांधलेल्या अंधाप्रमाणेच या जगात झाली आहे.

वरील गोष्टीमध्ये एखादा वाटसरु त्या मनुष्यास जंगलात भेटतो, त्याच्या डोळ्यावरची पट्टी काढतो आणि गांधार देशास जाण्याचा मार्ग त्यास सांगतो. तो बिचारा मनुष्य वाटसरुंनी दिलेल्या सूचना पाळतो व आपल्या गांधार देशात परत जातो.

आपणही असेच अज्ञानामुळे अंध झालो आहोत. परंतु आपणास गुरु भेटतात आणि त्यांच्या योग्य मार्गदर्शनामुळे खरे ज्ञान प्राप्त होऊन अज्ञानापासून आपली सुटका होते. छांदोग्य उपनिषदात वरील रुपकाचा उल्लेख आला आहे.

जगद्गुरु श्रीमद् आद्य शंकराचार्यांनी गुरुस्तवनरपर स्तोत्रे केली आहेत.

आपल्या 'गुर्वष्टकम्' या स्तोत्रामध्ये ते म्हणतात:-

**शरीरं सुरुपं तथा वा कलत्रं**
**यशश्चारु चित्रं धनं मेरुतुल्यम् ।**
**मनश्चेन्न लग्नं गुरोरङ्घ्रिपद्मे**
**तत: किं तत: किं तत: किं तत: किम् ॥**

शरीर देखणे आहे, तशीच बायकोपण सुंदर आहे. वक्ता, लेखक विद्वान, प्रेमळ नेता, लोककल्याणकर्ता इत्यादी रुपांनी अनेक प्रकारची कीर्ती आहे, पर्वतप्राय धनांच्या राशी आहेत, सर्वकाही आहे, पण मन जर सद्गुरुंच्या, अथवा श्रीहरिच्या चरणी संलग्न झालेले नसेल, तर ते सर्व व्यर्थ होय, त्याचा काय उपयोग ?

गुर्वष्टक या आपल्या स्तोत्रामध्ये आठही श्लोकांत प्रत्येकी चवथ्या पंक्तीमध्ये आचार्य विचारतात-

**तत: किं तत: किं तत: किं तत: किम् ॥**

काय उपयोग ? सद्गुरुशिवाय सर्वकाही व्यर्थ आहे.

मानवी देहत्याग करण्यापूर्वी आचार्यांनी उपदेश केला आहे, तो असा:-

श्लोक:-

**स विद्वात् उपसर्प्यतां प्रतिदिनम्**
**तत्पादुका: सेव्यताम् ।**
**ब्रह्मैकाक्षरमर्थ्यतां श्रुतिशिरी वाक्यं**
**समाकल्प्यताम् ॥**

अति पवित्र आणि सर्वज्ञ अशा श्रीगुरुंचे चरणाची नित्य सेवा करावी. त्यांचे अमोल मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा आणि उपनिषदातील महावाक्याचे ज्ञान प्राप्त करावे.

गुरुविण कोण दाखविल वाट ? गुरुसम अन्य दुजा कोणीही नाही. धातूचे सोने करणाऱ्या परिसाबरोबर त्यांची तुलना करता येईल, परंतु अशी तुलनाही योग्य नाही, कारण परिस धातूचे सोने करील, परंतु सद्गुरु एखाद्या मतिमंद शिष्यसही आपणासारखा विद्वान आणि श्रेष्ठ करु शकतो. (आचार्य भगवत्पादांनी त्यांचे तोटक नावाच्या मठ्ठ शिष्यासही आपणासारखे विद्वान केले - ही सत्यकथा आहे.)

कामकोटी पीठाचे गुरुपरंपरेचे अवलोकन केले असता, परमाचार्यांचे अन्य दुजा कोणीही तुलनीय असू शकेल काय, अशी दाट शंका मनात येते. परमाचार्य आमच्यामधील केवळ चालते-बोलते संचारी देव नसून सर्वश्रेष्ठ, एकमेव, ब्रह्मस्वरुप आणि वादातीत महापुरुष होत !

**नारायण ! नारायण ॥**

**मूळ इंग्रजी लेखाचा अनुवाद**
(अनुवाद : म. पां. वाळिंबे)





# नामस्मरणाचे महत्त्व

- नामदेव नाझरे

नामस्मरणाचे महत्त्व जगातील सर्व संतांनी सांगितले आहे. नामस्मरण अत्यंत सोपे व सुलभ आहे. शारीरिक कोणत्याही स्थितीत नामजप नामस्मरण सहज करता येते. याला वयोमर्यादा मुळीच नाही व वेळेचेही बंधनसुद्धा नाही. त्यामुळे खाता-पिता, फिरताना व काम करताना नामस्मरण निरंतर अखंड प्रेमाने भक्तिभावाने निष्ठापूर्वक श्रद्धेने मन शांत-स्थिर ठेऊन करावे. सामुदायिक नामस्मरण घरात केल्यास मंगलमय, पवित्र, सुप्रसन्न वातावरण पसरते. घरकुलात भगवंताचा निवास होतो, बौद्धिक विकास होतो, भक्तिज्ञानात वृद्धि होते, मनोधैर्य प्रबळ होते. नामस्मरण केल्यामुळे सुखशांती, समाधान, समृद्धी प्राप्त होते. भविष्यात येणाऱ्या संकटाचे निवारण होते. नामस्मरण केल्यामुळे स्वभाव प्रेमळ, कृपाळू होऊन सेवाभावी मनोवृत्ती बनते.



नामस्मरण करणाऱ्याला योग्य सुंदर वळण लागते, हृदयाचे परिवर्तन होते, सामान्य मनुष्य शिस्तबद्ध, सुजाण, सुशील, उत्तम नागरिक बनतो.

नित्य नामस्मरण केल्याने चित्त चिंतारहित व सात्विक गुणसंपन्न होते. मनावर कोणताही ताण पडत नाही. सद्बुद्धी उत्पन्न करण्याचे सामर्थ्य भगवंताच्या नामातच आहे. आचार-विचार विवेक शुद्ध होते. सद्गुरुकृपेने आध्यात्मिक उन्नती होते.

नामस्मरणाने मनोविकृतीचे समूळ उच्चाटन होते. परमेश्वराची भेट होते. साधुसंत, विचारवंत, ज्येष्ठ साधक भक्ताचा ईशकृपेने सहवास घडून येतो. बोधामृत प्राशन करण्याची सुवर्णसंधी मिळते. त्यांच्या विचारधनाचा शुभलाभ होऊन आध्यात्मिक श्रीमंती वाढते. ही ईश्वरी देणगी लाभते. नामस्मरणाने नराचा नारायण होतो, मन उन्मन होते. नामस्मरणाच्याद्वारे संपूर्ण आरोग्य चांगले करून घेणे सर्वांच्या हिताचे, फायद्याचे आहे.

सामुदायिक नामस्मरणात साधकांनी भाविक नागरिकांनी सक्रिय सहाय्य, सहकार्य करून, प्रामुख्याने सहभागी होऊन नामस्मरणाचा प्रचार मनोभावे केला पाहिजे. त्यामुळे भक्त लोकप्रिय समाजसेवक बनतो, समाजकल्याणाच्या कामात सदैव कार्यमग्न होतो. मानवकल्याण हीच खरी परमप्रिय भगवंताची सेवाभक्ती आहे. त्यामुळे जीवनाचे सोने व सार्थक होते. मनाला धन्य धन्य कृतार्थ वाटते. नामस्मरणाने जगात प्रेमाने शांतीचे साम्राज्य प्रस्थापित करता येते, एकमेका सहाय्य करण्याची सद्भावना निर्माण होते. नामस्मरणाची महती महान आहे. त्याची गोडी सतत वाढत राहो, ही दिव्यशक्ती सर्व भक्तांना, भाविकांना साधकांना लाभो.

सद्गुरुकृपेने भगवंताच्या सच्चिदानंदमय स्वस्वरुपाचा अमृतानुभाव प्राप्त करण्याचा नामस्मरण हेच एकमेव, सर्वश्रेष्ठ परममंगल साधन आहे, याचा सर्वांनी श्रद्धेने लाभ घेण्याचा प्रयत्न करून पुण्य मिळवावे. आनंद द्या व आनंद घ्या. परमेश्वराला नेहमी नमस्कार करा. देवाविषयी परमादर ठेवून सर्व कर्मे करीत जा. नामस्मरणाच्या ओढीतूनच संतसंगती पूर्व पूण्याईने लाभते. नामस्मरणाने दिव्य विचारशक्ती, भक्ती प्राप्त होते. त्यामुळे जीवनात आनंदाची पर्वणी, आनंदाने भक्तिभावाने मिळते. मनुष्य यशवंत, कीर्तिवंत सुखी-समाधानी होतो. नामजप करणारा भक्तच भगवंताचा शोध-वेध आपल्या हृदयमंदिरात ईशकृपेने घेत राहतो. भगवंताच्या सद्गुरुप्रणीत राजमार्गावरून यशस्वीपणे वाटचाल करीत राहतो.

देह राहो अथवा जावो मुखात अखंड नामजप राहो !

॥ जय सच्चिदानंद ॥

# आगळे-वेगळे सद्गुरु श्री साईबाबा

- प्राचार्य वाय. सी. कुलकर्णी

❖❖❖

**आपण अनेक संत, महात्मे, योगी पाहतो त्यांचे दर्शन करतो. पण श्री साईबाबा या सर्वांपेक्षा आगळे-वेगळे आहेत. प्रचलित-पारंपारिक कल्पनेतून आपण श्री साईबाबांकडे न पाहता त्यांच्या वेगळेपणाचा शोध घेतल्यावर आपणास त्यांचे अलौकिक महात्म्य लक्षात येते. प्राचार्य कुलकर्णी यांनी श्री बाबांच्या आगळे-वेगळेपणाची काहीशी ओळख आपणास या लेखाद्वारे करून दिलेली आहे.**

❖❖❖

सनातन भारतीय संस्कृतीमध्ये गुरुला अनन्यसाधारण महत्त्व देण्यात आले आहे. गुरु हा ब्रह्मा, विष्णु, महेश आणि साक्षात् परब्रह्म आहे, असे मानले जाते. गुरुमूर्तीला ध्यानमुल, गुरुचरणांना पूजामुल, गुरुवाक्याला मंत्रमुल आणि गुरुकृपेला मोक्षमुल समजले जाते. गुरुचे स्थान ईश्वरापेक्षाही श्रेष्ठ समजले जाते. आणि गुरुपेक्षा सद्गुरुचे स्थान अधिक श्रेष्ठ समजले जाते. आध्यात्मिक विद्या शिकविणारा तो सद्गुरु, अशी सद्गुरुची व्याख्या केली जाते. काहींच्या मते जो सद्वस्तूची ओळख करून देतो तो सद्गुरु.

साईबाबा अध्यात्म क्षेत्रात सर्वोच्च स्थानावर विराजमान झाले होते, आध्यात्मिक क्षेत्रात ते अतिशय उन्नत अवस्थेत पोहोचले होते. आणि म्हणूनच ते सद्गुरु पदास पूर्णपणे पात्र होते. सद्गुरु साईबाबा त्यांच्या भक्तांच्या मनात असलेली आत्मा, परमात्मा, ब्रह्म आणि परब्रह्म ह्या तत्वप्रणालींशी संबंधित जिज्ञासा पूर्ण करीत असत.

सद्गुरु साईबाबांच्या उपदेशामुळे भक्तांचा जिवभाव नष्ट होऊन ते आत्मभावावर स्थिर होत असत. ह्याचा अर्थ असा होतो की, सद्गुरु साईबाबांच्या मार्गदर्शनामुळे भक्त आत्मस्थलापर्यंत पोहोचू शकत होते. जिवभाव असलेल्या आत्म्याचे किंवा जिवात्म्याचे अशुद्ध जीव, शुद्ध जीव व मुक्त जीव असे तीन प्रकार असतात. सद्गुरु साईबाबांच्या उपदेशानुसार आचरण करणारी व्यक्ती निश्चितच अशुद्ध जीवदशेतून शुद्ध जीवदशेत जात असे आणि अंती मुक्त जीवदशा प्राप्त करून घेत असे. श्री साईबाबांकडे सद्गुरुची सर्व लक्षणे होती. सद्गुरु क्षमाशील असतो. आणि साईबाबा निश्चितच क्षमाशील वृत्तीचे होते. सद्गुरु साईबाबा त्यांच्यावर श्रद्धा ठेवणाऱ्यांकडून कायिक, वाचिक, मानसिक वा सांसर्गिक ह्यापैकी कोणत्याही प्रकारचे अपराध झाले तर त्यांना क्षमा करीत असत. चितश्रीच्या जंगलातील भिल्ल दरोडेखोरांनी केलेल्या हल्ल्यात जखमी झालेल्या काशीरामला बैलगाडीतून द्वारकामाईत आणणारी सीता बेरड ही एक कुलटा होती. चितश्रीच्या जंगलातील भिल्ल दरोडेखोरांची ती रखेली होती. परंतु साईबाबांना शरण जाताच त्यांनी तिला क्षमा करून सन्मार्गाला लावले. आपल्या क्षमाशील वृत्तीमुळेच सद्गुरु साईबाबांनी रात्री-अपरात्री कर्कश आवाजात कलमा पढून सर्वांची व आपलीदेखील झोपमोड करणाऱ्या रोहिल्याला शिर्डीतील रहिवाश्यांनी तक्रार करूनदेखील प्रतिबंध केला नाही. शिर्डीत आगमन केल्यापासून अत्यंत काळजीपूर्वक साईबाबांनी सांभाळून ठेवलेली वीट त्यांच्या देहत्यागाच्या काही दिवस आधी द्वारकामाईची साफसफाई करणाऱ्या मुलाच्या हातून चुकून पडली व फुटली. सद्गुरु साईबाबांना वीट फुटल्यामुळे फार दुःख झाले. त्यांनी आपले दुःख प्रगटदेखील केले. परंतु ज्या मुलाच्या हातून वीट पडून फुटली त्याच्यावर साईबाबा रागावले नाहीत. त्यांनी त्या मुलाला क्षमा केली. नाना वल्ली नांवाच्या विक्षिप्त साईभक्ताने तर एकदा साईबाबांचा हात धरून त्यांच्या आसनावरून उठविले व

आपण स्वत: साईबाबांच्या आसनावर काही वेळ बसून राहिले. तरीदेखील साईबाबा शांत राहिले व त्यांनी नाना वल्लीला आपल्या आसनावर बसण्यापासून परावृत्त केले नाही किंवा नंतर त्याची कान उघडणीदेखील केली नाही.

सद्गुरु पुण्यात्मा असल्यामुळे तो शिष्यांच्या कल्याणासाठी आपले पुण्य खर्च करून त्यांच्यावर अनुग्रह करीत असतो. सद्गुरु साईबाबादेखील विविधप्रकारे आपल्या अनेक भक्तांवर अनुग्रह करीत असत. सद्गुरु साईबाबांनी आपल्या इंद्रियांवर निग्रह करून अपार शक्ती प्राप्त केली होती म्हणूनच ते भक्तांवर अनुग्रह करु शकत. सद्गुरु साईबाबा आपल्या भक्तांवर विविध प्रकारचे अनुग्रह करीत असत. साईबाबा कायनुग्राहक होते. कारण ते भक्तांवर आपल्या शरीराद्वारे अनुग्रह करीत असत. साईमंदिरामध्ये साईबाबांच्या मूर्तीची विधिवत प्राणप्रतिष्ठापना केलेली असते. ह्यामुळे साईबाबांच्या मूर्तीमध्ये साईबाबांचे शारीरिक वास्तव्य असते आणि म्हणूनच त्यांच्या मूर्तीच्या दर्शनाने, पूजनाने भक्तांना अनुग्रह प्राप्त होतो. असंख्य साईभक्तांनी ह्या कायानुग्रहाचा अनुभव घेतलेला आहे. सद्गुरु साईबाबांचे शरीर परब्रह्मस्वरुप झालेले होते. म्हणून त्यांच्या दर्शनाने भक्तांच्या ठिकाणी इंद्रियव्यवहारासंबंधी विवेक उत्पन्न होत असे. हा विवेक साईबाबांच्या संयमशील इंद्रियांचा अनुग्रह असल्यामुळे निर्माण होत असे म्हणून ते इंद्रियानुग्राहक होते. साईबाबा आपल्या इंद्रियांच्याद्वारे भक्तांची ज्ञानेंद्रिये आणि कर्मेंद्रिये शुद्ध करून त्यांच्यावर अनुग्रह करीत असत, त्यांच्या इंद्रियांवर, मनावर नियंत्रण ठेवीत असत. सद्गुरु साईबाबा आपल्या भक्तांवर प्राणानुग्रहदेखील करीत असत. प्राणानुग्रह करणे म्हणजे प्राणावर अनुग्रह करणे. प्राणायाम हा प्राणनियंत्रणाचा अत्यंत सोपा मार्ग आहे. परंतु सद्गुरु साईबाबांनी प्राणानुग्रह केलेल्या भक्ताचे प्राणायाम न करताच प्राणावर आपोआप स्वाभाविक नियंत्रण राहते. साईबाबांनी केलेल्या प्राणानुग्रहामुळे भक्ताचे हृदय श्वासोश्वासाच्या क्रियेमुळे दुर्बल होत नसे व साहजिकच त्यामुळे साईभक्त दिर्घायुषी होत असत. साईबाबांनी केलेल्या प्राणानुग्रहामुळेच भक्तांच्या प्रमाण, विपर्यय, निद्रा, विकल्प व स्मृती ह्या पाच वृत्ती शांत होत असत व त्यामुळे भक्तांचे मनदेखील शांत होत असे.



सद्गुरु साईबाबांच्या अनुग्रहामुळे त्यांच्याकडे येणाऱ्या व्यक्तींवर झालेले सर्व वाईट पूर्व संस्कार नष्ट होऊन पापात्मादेखील पुण्यात्मा बनत असत. सद्गुरु साईबाबांनी केलेल्या अनुग्रहामुळे भक्तांच्या जीवनाचे, जन्माचे सार्थक होत असे. साईबाबांच्या अनुग्रहामुळे त्यांचे भक्त उदरनिर्वाह, संतती, व्याधी आणि इतर सर्व संकटांपासून मुक्त होत असत. सद्गुरु साईबाबांकडून अनुग्रहित झालेल्या भक्तांच्या सर्व प्रापंचिक समस्या समूळ नष्ट होऊन त्यांचे जीवन सुखी समाधानी व समृद्ध होत असे, त्यांच्या परिश्रमाचे चिज होऊन त्यांना निश्चितपणे हाती घेतलेल्या प्रत्येक कार्यात यशप्राप्ती होत असे. साईबाबांच्या अनुग्रहामुळे भक्तांकडून फार मोलाचे कार्य होत असे, सत्कर्म होत असे. केवळ साईबाबांच्या अनुग्रहामुळे श्री. अण्णासाहेब दाभोलकर उर्फ हेमांडपंत हे श्री. साईसत्चरित्र हा अजरामर ग्रंथ लिहू शकले. नानासाहेब निमोणकर अंतिमसमयी उन्मनी अवस्थेपर्यंत पोहोचू शकले आणि सर्वसाधारण आर्थिक परिस्थिती असूनदेखील माधवरावांना त्याकाळी खडतर आणि खर्चिक असलेल्या भारतातील जवळजवळ सर्व तीर्थक्षेत्रांच्या यात्रा घडू शकल्या.

सद्‌गुरुचे मन प्रेमरसात विरघळून गेलेले असते आणि म्हणूनच तो आपल्या शिष्यांवर प्रेमामृताचा वर्षाव करीत असतो. ज्याप्रमाणे आई प्रेमस्वरुप असते त्याचप्रमाणे सद्‌गुरुदेखील प्रेमस्वरुप असतात. साईबाबा आपल्या भक्तांवर एवढे प्रेम करीत असत की ते खऱ्या अर्थाने भक्तांची माता होते, साईमाऊली होते. आपल्या भक्तांवरील उत्कट प्रेमामुळेच सद्‌गुरु साईबाबांनी भट्टीत पडणाऱ्या आपल्या लोहार भक्तिणीच्या मुलाला पेटलेल्या धूनीत हात घालून वरच्यावर पकडले व त्याचे प्राण वाचविले. पेटलेल्या धूनीत हात घातल्यामुळे साईबाबांचे हात भाजले, परंतु भक्तावरील प्रेमामुळे साईबाबांना हात भाजल्याची तमा नव्हती. भक्तांवरील उत्कट प्रेमामुळेच साईबाबांनी दादासाहेब खापर्डेच्या मुलाची प्लेगच्या व्याधीतून सुटका करण्यासाठी त्याची प्लेगची व्याधी स्वतःवर घेतली आणि म्हणूनच त्यांच्या दोन्ही काखेत प्लेगच्या टवटवीत लालमडक गाठी आल्या होत्या. भक्तप्रेमामुळेच सद्‌गुरु साईबाबांनी एका गरीब वृद्ध महिलेने खाऊ म्हणून आणलेली तिची उष्टी भाकर आणि एक कांदा जणूकाही आपल्याला पंचपक्वानांचे भोजन मिळाले आहे अशा थाटात मिटक्या मारीत खाल्ली आणि आपण खरोखरच तृप्त झालो आहोत ह्याची पावती म्हणून मोठ्याने ढेकर दिला. केवळ भक्तप्रेमामुळे साईबाबांनी हंसराज ह्या दम्याची व्याधी असलेल्या भक्ताची दही खाण्याची वाईट सवय घालविण्यासाठी मांजराचे रूप घेऊन दही चोरून खायला सुरुवात केली आणि दही खायला न मिळाल्यामुळे संतप्त झालेल्या हंसराजकडून मांजरीच्या रुपात भरपूर मार खाल्ला होता.

सद्‌गुरुच्या ठाई असलेली समानता किंवा समदृष्टी तर साईबाबांच्या दृष्टीत ओतप्रोत भरलेली होती. साईबाबा आपल्या भक्तांमध्ये भेदभाव अजिबात मानीत नव्हते; करीत नव्हते. म्हणूनच विविध जाती-धर्म, पंथ व प्रांतातील व्यक्ती साईबाबांच्या भक्त बनल्या होत्या. साईबाबांनी आपल्या गरीब-श्रीमंत, रोगी-निरोगी, शिक्षित-अशिक्षित, इतकेच नव्हे तर सत्कर्म आणि कुकर्म करणाऱ्या भक्तांमध्येदेखील कधीही भेदभाव केला नाही. ते सर्वांकडे समदृष्टीने पहात असल्यामुळे खऱ्या अर्थाने भेदातीत होते. सद्‌गुरु साईबाबांच्या ठायी स्वजातीय, विजातीय आणि स्वगत ह्यापैकी कोणत्याही प्रकारचा भेदभाव नव्हता. इतकेच नव्हे तर प्रपंच आणि परमार्थ हा भेददेखील त्यांना जाणवत नव्हता. त्यांना प्रपंचात परमार्थ दिसत असे. आणि परमार्थ हाच त्यांचा प्रपंच होता. साईबाबांना प्रपंच आणि परमात्मा हा भेददेखील जाणवत नव्हता. त्यांच्या दृष्टीने प्रपंच परमात्मारुप होता. सद्‌गुरु साईबाबांचे भेदज्ञान लुप्त झाले होते.

सद्‌गुरु असल्यामुळे साईबाबांची व्यावहारिक स्थिती वा वर्तणूक अतिशय शुद्ध होती. त्यांच्या व्यवहारामध्ये स्वार्थ मुळीच नव्हता. ते कधीही, कोणाकडूनही, काहीही काम विनामूल्य करून घेत नसत. त्यांच्या दरबारात विविध प्रकारची दैनंदिन स्वरुपाची कामे करणाऱ्यांना ते दररोज त्यांच्या कामाचा पगार देत असत. कधी-कधी तर साईबाबा पगार वाटण्यासाठी पुरेसे पैसे जवळ नसल्यास शिर्डीतील वाण्यांकडून पैसे उसने घेत असत. परंतु उसने घेतलेले सर्व पैसे ते कटाक्षाने परत करण्याची व्यवस्था करीत असत. कधीकधी ते वाण्यांकडून किरणा मालदेखील उधार घेत असत. आणि उधार घेतलेल्या मालाचे पैसे न विसरता चुकते करीत असत. सद्‌गुरु साईबाबांचा व्यावहारिक दृष्टीकोन इतका शुद्ध होता की ते त्यांच्यासमोर हजेरी लावणाऱ्या, म्हणजेच आपली कला सादर करणाऱ्या प्रत्येक कलाकाराला एक रुपया बिदागी देत असत. साईबाबा दररोज सकाळी स्नान केल्यानंतर आपल्या उजव्या हाताच्या मनगटाला तुपात भिजविलेली एक चिंधी, त्यांचा एक महारोगी भक्त भागोजी शिंदेकडून बांधून घेत असत. मात्र इतके किरकोळ काम करण्यासाठीदेखील ते भागोजीला दररोज एक रुपया बिदागी देत असत. सद्‌गुरु साईबाबा त्यांच्या धुनीसाठी लाकडे विकत घ्यायचे. ही लाकडे विकत घेताना ते लाकडे विकणाऱ्या मोळीवाल्यांबरोबर घासाघीस करीत असत. परंतु ही घासाघीस करण्यामागील त्यांचा उद्देश कमी किंमत देणे नव्हता, तर योग्य किंमत देणे हाच होता. केवळ अत्यंत शुद्ध व्यावहारिकदृष्टीमुळेच भक्तांनी न मागता, स्वतः होऊन दक्षिणा दिली तर साईबाबा संपूर्ण दक्षिणा किंवा दक्षिणेचा काही भाग भक्तांना परत करीत असत.

साईबाबा हे खरोखरच सद्‌गुरु असल्यामुळे त्यांच्या ठिकाणी किंचितदेखील द्वैत नव्हते. त्यांचे मन अद्वैत भावनेने पूर्णपणे भरून गेले होते. ते केवळ आपल्या अंतरात्म्यालाच

पहात असत. ते सदैव ध्यानावस्थेत राहून आपल्या अंतरात्म्याचे दर्शन घेत असत. म्हणूनच त्यांना अनेकदा त्यांच्याभोवती असलेल्या जगाची जाणीवदेखील नसायची. सद्‌गुरु साईबाबा सतत परम जगतात असल्यामुळे तासन्तास शुन्याकडे नजर लावून असायचे. त्यांचे आविर्भाव, वागणे, बोलणेदेखील सर्वसामान्य भक्तांच्या दृष्टीने अनाकलनीय असायचे, अगम्य असायचे. सद्‌गुरु साईबाबा ज्ञानी पुरुष असल्यामुळे पूर्णपणे कृतकृत्य झालेले होते. त्यांच्याकडे जाणण्यासारखे काहीही शिल्लक राहिलेले नव्हते. त्यांनी सर्व काही जाणलेले होते. म्हणून ते अवेत्ता होते. सद्‌गुरु साईबाबांच्या ठाई स्थूल, सूक्ष्म व कारण ह्या तिन्ही देहांचा अभिमान नसल्यामुळे ते अदेहीदेखील होते. अदेही असल्यामुळे त्यांनी आपला स्थूल देह भक्तांच्या सेवेसाठी, सूक्ष्म देह भक्तांच्या उद्धारासाठी आणि कारण देह भक्तांच्या आध्यात्मिक प्रगतीसाठी पूर्णपणे समर्पित केला होता आणि त्यांची दृष्टी मनाच्या पलीकडे निराकार चिदाकाशात विलीन झाली होती.

श्री साईबाबा सद्‌गुरु असल्यामुळे सद्‌गुरुकडे असलेली सुचिता साईबाबांकडेदेखील होती. सुचिता म्हणजे पावित्र्य. साईबाबा म्हणजे साक्षात् सुचिताच होती. त्यांची सुचिता ही शारीरिक, वाचिक आणि मानसिक अशा तीन प्रकारची होती. शारीरिक सुचिता राखण्यासाठी ते आपल्या आहारावर नियंत्रण ठेवीत, दररोज लेंडीबागेत जाऊन योगसाधना करीत, स्वच्छता राखीत, निसर्गाशी समरस होत. अंगमेहनतीचे काम करीत, बाहेर फिरायला जात आणि द्वारकामाईत फेऱ्या मारीत. वाचिक सुचिता राखण्यासाठी सद्‌गुरु साईबाबा अध्यात्म, आत्मा, परमात्मा, नीति ह्या पवित्र विषयांवर बोलत असत. तसेच द्वारकामाईत धर्मग्रंथांचे पठण करून घेत असत. साईबाबांची वाणी अमृतवाणी होती. ते भक्तांबरोबर अतिशय मधूर वार्तालाप करीत असत. साईबाबांच्या मानसिक सुचितेचा पुरावा म्हणजे त्यांचे मन सदैव अतिशय पवित्र विचारांनीच भरलेले असायचे. ते इतरांबद्दल काहीही अनिष्ठ चिंतन करीत नसत. अगदी देहत्यागाच्या क्षणापर्यंत साईबाबांच्या मनात भक्तांच्या कल्याणाचे उद्धाराचे विचार होते. तसेच मानसिक, सुचिता राखण्यासाठी ते सदैव ईश्वर चिंतन करीत असत. ''अल्ला मालिक'' हा त्यांचा जप ते जागृत आणि निद्रिस्त अवस्थेत असतानादेखील चालत असे.

सद्‌गुरु वानप्रस्थ असता, ह्याचा अर्थ ते वनात वास्तव्य करून असतात असा नव्हे. वानप्रस्थ ही एक मानसिक अवस्था आहे. वानप्रस्थ म्हणजे अशी मानसिक अवस्था की जी लाभलेली व्यक्ती प्रपंचाच्या मोहातून मुक्त असते. सद्‌गुरु साईबाबा ह्या मानसिक अवस्थेमध्ये स्थिर झालेले असल्यामुळे ते वानप्रस्थ होते. आपल्या भक्तांचे प्रपंच हे साईबाबांचेच प्रपंच होते. साईबाबा आपल्या भक्तांचे प्रपंच चालवीत असत, परंतु त्यांच्या मनात प्रपंचाविषयी आसक्ती निर्माण होऊन ते स्वत: भक्तांच्या प्रपंचात गुंतून रहात नसत.

आध्यात्म शास्त्रामध्ये अशीही एक विचारधारा आहे की सद्‌गुरु हे 'अत्याश्रमी' असतात. म्हणजेच ते ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ आणि संन्यस्थ ह्या चार आश्रमांपलीकडे गेलेले असतात. सद्‌गुरु साईबाबांच्या बाबतीत ही विचारधारा तंतोतंत लागू आहे, यात संशयच नाही. साईबाबा निश्चितच 'अत्याश्रमी' होते. ते वर उल्लेखिलेल्या चार आश्रमांपलीकडे असलेल्या 'स्व-स्थ' आश्रमात गेले होते. म्हणजेच ते स्वत:च्या ठिकाणी, आत्म्याच्या ठिकाणी स्थिर झाले होते, मग्न झाले होते आणि याचा सबळ पुरावा म्हणजे त्यांचे सतत सुरु असलेले आत्मचिंतन.

आपल्या भक्तांना उपदेश करणे हे तर सद्‌गुरुचे परम पवित्र कर्तव्य आहे किंवा सद्‌गुरुचा अधिकारच आहे. साईबाबादेखील आपल्या भक्तांना अनेक मार्गांनी उपदेश करीत असत. आपल्या भक्तांना उपदेश करताना सद्‌गुरु साईबाबा कधी शब्दांत बोलायचे, तर कधी शरीराने बोलायचे. कधी त्यांचा उपदेश स्पष्ट, म्हणजे सहज कळण्यासारखा असायचा, तर कधी अस्पष्ट, सूचक आणि कळण्यास कठीण असायचा. भक्तांना गोष्टी सांगून त्याद्वारे उपदेश करण्यात तर साईबाबा अतिशय कुशल होते. कधीकधी ते भक्ताच्या आयुष्यात विशिष्ट प्रसंग निर्माण करून किंवा एखादी घटना योजून त्याद्वारे योग्य तो उपदेश करीत असत. सद्‌गुरु साईबाबांच्या उपदेशामुळे जगाचा विसर पडून भक्तांना चैतन्याचा अनुभव यायचा, अद्वैताचा परमानंद लाभायचा. सद्‌गुरु साईबाबा उपदेशाचे अंजन वापरून भक्तांच्या ज्ञाननेत्रावर


पडलेला अज्ञानरूपी पडदा दूर करून त्यांचे ज्ञाननेत्र उघडित असत, त्यांच्या मनातील द्वंद्व दूर करीत असत आणि त्यांच्या सर्व शंकांचे निरसन करीत असत. साईबाबांच्या उपदेशामृताचे प्राशन केल्यामुळे भक्तांना स्वानंदाचा लाभ होत असे, त्यांची भेदबुद्धी नष्ट होत असे आणि त्यांच्या जीवनी दुःखांचा लवलेशदेखील रहात नसे. गुरु ह्या शब्दातील 'गू' ह्या अक्षराचा अर्थ आहे अज्ञान आणि 'रु' ह्या अक्षराचा अर्थ आहे निवारण करणारा. तेव्हा गुरु म्हणजे ज्ञानोपदेशाने अज्ञान निवारण करण्याची पात्रता असलेली व्यक्ती व सद्‌गुरु म्हणजे ज्ञानोपदेशाने आध्यात्मिक अज्ञान निवारण करणारी व्यक्ती. साईबाबांच्या बाबतीत 'सद्‌गुरु' ह्या संकल्पनेचा वरील मतितार्थ किंवा गर्भीतार्थ पूर्णपणे लागू आहे, कारण ते योग्य तो उपदेश करून भक्तांच्या आध्यात्मिक अज्ञानाचे निराकरण करीत असत, आणि त्यांना ज्ञानरुप सत्य समजावून सांगत असत. सद्‌गुरुचा प्रसाद म्हणजे त्याचा उपदेश सद्‌गुरु साईबाबा त्यांच्या अवतार समाप्तीपर्यंत, म्हणजे जवळजवळ पन्नास वर्षे त्यांच्या दर्शनास येणाऱ्यांना उपदेशरुपी ज्ञानप्रसाद देत होते.

आपल्या शिष्यांच्या मनात असलेल्या प्रपंच, आत्मा, परमात्मा विविध तत्वप्रणाली किंवा विचारप्रणाली, धर्मग्रंथ ह्यांच्याशी संबंधित असलेल्या जिज्ञासा सद्‌गुरु समाधानकारकपणे पूर्ण करीत असतात. साईबाबा सद्‌गुरुंचे हे कर्तव्य तर नेहमीच पार पाडीत असत. ब्रह्म कसे असते, हे मला दाखवा, असा साईबाबांना आग्रह करणाऱ्या श्रीमंत, परंतु लोभी व्यापाऱ्याला साईबाबांनी ब्रह्म जाणण्यासाठी, पाहण्यासाठी आवश्यक असलेली मानसिक अवस्था अत्यंत प्रभावीपणे, समजावून दिली होती. साईबाबांनी आपल्याला गुरुमंत्र द्यावा, आपल्यावर अनुग्रह करावा म्हणून अन्न-पाण्याचा त्याग करणाऱ्या राधाबाईंनादेखील सद्‌गुरु साईबाबांनी योग्य तो उपदेश करून त्यांच्या मनातील अनुग्रहाबद्दल असलेले गैरसमज दूर केले होते. सद्‌गुरु साईबाबांनी त्यांना श्रद्धा आणि सबुरीचा संदेश दिला, गुरुमंत्र मिळविण्यासाठी त्यांनी धरलेला दुराग्रह दूर केला. 'सद्‌गुरु' ही आपली भूमिका पार पाडण्यासाठीच साईबाबांनी ईशावास्य उपनिषदातील एका तत्वाच्या अर्थासंबंधी दासगणूंना असलेल्या शंकेचे निरसन काकासाहेब दिक्षितांच्या तरुण मोलकरणीच्या नवीन साडी मिळाल्यानंतरच्या वर्तणुकीद्वारे केले. नानासाहेब चांदोरकर भगवतगीतेतील चौथ्या अध्यात्म्यातील चौतिसाव्या श्लोकातील ''ज्ञानिनिस्तत्त्वदर्शिनं'' ह्या शब्दाचा गीतेवरील सर्व भाष्यकारांनी सांगितलेल्या अतिशय वेगळ्या प्रकाराने अर्थ लावून जगद्‌गुरु श्रीकृष्णाला अर्जुनाला ह्या शब्दाद्वारे निश्चितपणे काय सुचवू इच्छित होते, हे सद्‌गुरु साईबाबांनी समजावून सांगितले.

सद्‌गुरु साईबाबा भक्तांच्या शंकांचे निरसन करून आणि त्यांना योग्य ते उपदेश करून त्यांच्या जीवनाला सुंदर आणि अर्थपूर्ण आकार देत असत. ते चुकीच्या दिशेने प्रवास करणाऱ्यांना, जीवनसागरात भरकटलेल्यांना उपदेशरुपी सुकाणू वापरून योग्य दिशा देत असत. सद्‌गुरु साईबाबा उपदेशाद्वारे भक्तांच्या शरीरावर, वाणीवर, मनावर संस्कार करीत असत. ह्या संस्कार करण्यासच 'दीक्षा' असे म्हणतात. सद्‌गुरु साईबाबा आपल्या भक्तांना नेहमीच दीक्षा देत असत. सद्‌गुरु साईबाबा भक्तांना दीक्षा देऊन त्यांच्या सूक्ष्म शरीराला होणारे कामज्वर, मोहज्वर, लोभज्वर व मत्सर ज्वर दूर करून त्यांना सद्‌गुणांनी सजवीत असत, अध्यात्म मार्गाने पायरी पायरीने आपल्या भक्तांना आत्मज्ञानाकडे घेऊन जात असत, त्यांना देवाचे गुप्त रूप दाखवून देत असत, त्यांचे आत्म्याशी पूर्ण ऐक्य साधून देत असत.

सद्‌गुरु हा सामान्य माणसासारखाच दिसतो. त्याच्या रूपवेषात काही वेगळेपणा असतो. परंतु त्याच्या मुखावर आत्मिक तेज विलसत असते. सद्‌गुरु साईबाबांची राहणीदेखील अतिशय साधी होती. ते मिताहारी होते. मात्र त्यांच्या मुखावर भक्तांना आत्मतेज निश्चितपणे दिसत असे. विशेषतः साईबाबांची आरती सुरू असतांना त्यांच्या मुखमंडलाभोवती तेजोवलय निर्माण होत असे. आपल्या आत्मिक तेजामुळे सद्‌गुरु साईबाबा आपल्या दर्शनास येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला प्रभावीत करीत असत. ह्या आत्म तेजामुळेच साईबाबांना वेडा फकीर समजणाऱ्या, साईबाबांच्या ठाई अजिबात श्रद्धा नसणाऱ्या, साईबाबांचे आयुष्यात प्रथमच दर्शन घेणाऱ्या आगंतुक व्यक्तीदेखील त्यांचे अनन्य निष्ठावान भक्त होत असत. सद्‌गुरु साईबाबांची रहाणी अतिशय साधी होती. कारण ब्रह्मज्ञान लाभल्यामुळे त्यांना इतर भौग्य

वस्तूंमध्ये अजिबात स्वारस्य नव्हते, त्यांना कशाचीही आसक्ती नव्हती, ते नित्यतृप्त होते. त्यांचे मन सदैव तृप्त व चिरसमाधानी असायचे. कोणाही भोग्य वस्तूंचा उपयोग करण्याचा विचारदेखील त्यांच्या मनात येत नसे. द्वारकामाईच्या जागी साईबाबांसाठी सुंदर वास्तु बांधण्याची अनेक भक्तांची इच्छा असूनदेखील साईबाबांनी असे करण्यास त्यांना कधीही परवानगी दिली नाही. भक्त साईबाबांना अनेक मौल्यवान वस्तू, वस्त्रे भेट देत असत. परंतु सद्गुरु साईबाबा ह्या वस्तूंचा कधीही वापर करीत नसत. एका भक्ताने साईबाबांना वाहन म्हणून एक घोडा अर्पण केला होता. साईबाबांनी ह्या घोड्याला 'श्यामसुंदर' असे सुंदर नाव दिले. परंतु ते कधीही ह्या घोड्यावर बसले नाहीत. ते झोपण्यासाठी उश्या-गाद्या वापरीत नसत तर भक्तांनी गोणपाटाचे तुकडे एकमेकांवर रचून तयार केलेल्या बिछान्यावरच निद्रा घेत असत. सद्गुरु साईबाबांना डेंगळे नावाच्या भक्ताने स्नान करण्यासाठी अप्रतिम चौरंग अर्पण केला होता. परंतु ते मात्र द्वारकामाईत चौरंगाशेजारी जमिनीवर टाकलेल्या फळीवर बसूनच स्नान करीत असत. ह्याचाच अर्थ असा होतो की सद्गुरु साईबाबा परातृप्त होते.



सद्गुरु दोषरहित असतो, निष्कलंक असतो. सद्गुरु साईबाबांच्या शरीरात, बुद्धीत किंवा मनात दोष या कलंक नव्हता, ते पूर्णपणे निष्कलंक होते, पवित्र होते. साईबाबा सद्गुरु असल्यामुळे त्यांचे भक्त, त्यांच्या दर्शनासाठी आलेल्या व्यक्ती वादकथेत, म्हणजेच वादविवाद करण्यात युक्त असल्यास साईबाबा त्यांना मार्गदर्शन करून त्यांच्या विचारप्रणालीतील दोष दूर करीत असत. सद्गुरुप्रमाणेच साईबाबा निःस्पृह होते, त्यांच्या मनात कसलीही इच्छा नव्हती. काही प्राप्त करण्याची आकांक्षा त्यांना नव्हती. म्हणजेच त्यांना काहीही प्राप्तव्य नव्हते. सद्गुरु साईबाबा सहसा शांत असत. त्यांचा क्रोध, त्यांची अशांती वरवरची असायची. केवळ भक्तांच्या भल्यासाठीच ते क्रोध आल्याचे दाखवत असत व क्रोधामागील उद्देश पूर्ण झाल्यावर ते लगेचच शांत होत असत. म्हणजेच त्यांना क्रोध हा मनात उद्भवणारा विकार नव्हता, क्रोध हा त्यांच्या मनोवृत्तीतील दोष नव्हता. ते कधीकधी वर-वर पहाता अशांत वाटले तरीदेखील आतून मात्र शांत, स्थिर, गंभीर व अचल असायचे. द्वेष हा विकार तर सद्गुरु साईबाबांच्या मनाला शिवतदेखील नसे.

सद्गुरु असल्यामुळे साईबाबा निर्मम होते. म्हणजेच त्यांचे त्यांनी धारण केलेल्या देहावर ममत्व नव्हते. त्यांच्या पाशी 'मीपणा', म्हणजेच अहंकार अजिबात नव्हता. ते शरीर, इंद्रिये आणि मन ह्या उपाधींपासून मुक्त होते. अहंकाराचा लवलेशदेखील नसल्यामुळे सद्गुरु साईबाबा त्यांच्याकडे शारीरिक व्याधींपासून व इतर दुःखे, व्यथांपासून मुक्ती मिळविण्याच्या मनोकामनेने आलेल्या व्यक्तींना ''अल्ला भला करेगा'' असा आशीर्वाद देत. तसेच अल्ला फार दयाळू आहे, तुम्ही त्याला शरण जा, तो तुम्हाला सर्व व्याधी-व्यथांपासून मुक्त करेल, असे म्हणून त्यांना व्याधी-व्यथांतून मुक्त करीत असत. म्हणजेच कर्ता-करविता ईश्वर असून मी केवळ त्याचा बंदा सेवक आहे अशीच निर्मळ भूमिका साईबाबांनी स्वीकारली होती.

त्याग केल्याशिवाय सद्‌गुरु पदापर्यंत पोहोचता येत नाही किंवा अढळ सद्‌गुरुपद मिळविता येत नाही. साईबाबा निश्चितच त्यागी पुरुष होते. ते स्वत:साठी कोणाकडूनही काहीही घेत नव्हते. परंतु स्वत:कडे असलेले सर्वकाही ते इतरांना देत असत. साईबाबांना भक्तांकडून दक्षिणा म्हणून जी रक्कम मिळत असे तिचा विनिमय ते आपल्या उदरनिर्वाहासाठी मुळीच करीत नसत. दक्षिणा म्हणून मिळालेल्या रकमेतून ते गरीब भक्तांना लग्न, मुंज इत्यादी मंगल कार्यासाठी मदत देत असत. तसेच दक्षिणा म्हणून जमा झालेल्या रकमेतून ते शिर्डीतील मंदिरांची आणि इतर प्रार्थनास्थळांची दुरुस्ती करून घेत असत. साईबाबांचे भक्त त्यांना दररोज पंचपक्वानांची ताटे नैवेद्य म्हणून अर्पण करीत असत. परंतु साईबाबा ह्या ताटांना हात लावून प्रसाद म्हणून भक्तांमध्ये वाटण्यासाठी ही ताटे परत करीत असत आणि स्वत: मात्र भिक्षाटण करून टमरेलामध्ये गोळा झालेले अन्न कालवून भक्षण करीत असत. त्यागवृत्तीमुळेच त्यांनी कधीही द्रव्य किंवा संपत्तीसंचय केला नाही. एक जुनाट टमरेल, पक्की भाजलेली वीट, सटका आणि सुईदोरा व जुने कपडे असलेले एक बोचके इतकीच त्यांची संपत्ती होती. साईबाबांची त्यागवृत्ती पराकोटीला पोहोचलेली होती आणि म्हणूनच काही भक्तांच्या मते तात्या कोते पाटलांचा प्राण वाचविण्यासाठी सद्‌गुरु साईबाबांनी त्यांची व्याधी आपल्यावर घेतली आणि देहत्याग केला.

सद्‌गुरु साईबाबा आविर्भावावस्थेतील योगी असल्यामुळे ते वार्धक्य, व्याधी व मृत्यु यांना अजिबात भीत नसत. त्यांच्या दृष्टीने मृत्यु हा केवळ एक उत्सव होता, ती एक 'महानवमी' होती. म्हणूनच त्यांनी वार्धक्य व मानमोडीचा विकार यांचे निमित्त म्हणून उपयोग करून अतिशय शांतपणे देहत्याग केला. सद्‌गुरु असल्यामुळे साईबाबांना तपश्चर्येचे बंधन नव्हते. तंत्र-मंत्र, उपवास, व्रत-वैकल्ये यांची त्यांना आवश्यकता नव्हती. कारण जे प्राप्त करून घेण्यासाठी हे सर्व करायचे असते ते त्यांच्याकडे होतेच मुळी. सद्‌गुरु हा सुखासनस्थ असतो. तो एकाच आसनावर दीर्घकाळ बसलेला असतो. त्याचे आसन स्थिर असते, तो आसनसिद्ध असतो. सद्‌गुरु साईबाबादेखील आसनसिद्ध होते. द्वारकामाईत वास्तव्य केल्यापासून जवळ जवळ दररोज तासन्‌तास आपल्या आसनावर बसून मानवजातीच्या उद्धाराचे, मानवजातीच्या कल्याणाचे आपले अवतारकार्य त्यांनी पार पाडलेले आहे. फक्त सकाळी भिक्षाटणास जाण्यास, दिवसातून दोन वेळा लेंडीबागेत जाण्यास व संध्याकाळी फिरावयास जाण्यास थोडा वेळ ते आपले आसन सोडीत असत. अन्यथा दिवसाचा इतर सर्व वेळ ते आपल्या आसनावरच अचलपणे कठड्याला डावा हात टेकून विराजमान झालेले असत.

सद्‌गुरु आपली पाच ज्ञानेंद्रिये, पाच कर्मेंद्रिये आणि ह्या ज्ञानेंद्रियांचा अध्यक्ष असलेले मन अशी एकादश इंद्रिये सांसारिक, प्रापंचिक व्यवहारासाठी वापरत नाही. तर सद्‌गुरुने ही सर्व इंद्रिये ईश्वराभिमुख केलेली असतात. म्हणजेच सद्‌गुरुने आपल्या सर्व इंद्रियांचा निरोध केलेला असतो. सद्‌गुरु साईबाबांच्या बाबतीत सद्‌गुरुचे हे लक्षण तंतोतंत लागू होते. सद्‌गुरु साईबाबांनी आपली सर्व इंद्रिये भगवत अर्पण केलेली होती. म्हणूनच त्यांच्या हृदयातून आणि प्रत्येक रोमारोमातून, श्वासोच्छ्श्वासातून भगवन्न स्फुरत असे. सद्‌गुरु पंचरत्नांनी संपन्न झालेला असतो. ही पंचरत्ने आहे. साधुसंग, हरिकथन, दया, धर्म आणि उपकार. सद्‌गुरु साईबाबा ह्या पंचरत्नांनी संपन्न होते. साईबाबांच्या द्वारकामाईत साधुसंतांचे येणे-जाणे, वास्तव्य नेहमीच असे. तसेच द्वारकामाईत साईबाबांच्या उपस्थितीत ईष्ट देवतांचे भजन, पूजन, नाम-जप, चिंतन, धर्मग्रंथ यांचें पठण सदोदित चालत असे. उत्तम आचरण, सत्य, अहिंसा, दानधर्म, उपकार, दया हा तर सद्‌गुरु साईबाबांचा स्थाईभाव होता. सद्‌गुरु हा भवसागर धन्वंतरी असतो. यास्तव साईबाबांनी भक्तांना दिलेले ज्ञान, उपदेश हे भवरोगांवर, म्हणजेच संसाररुपी रोगावर अत्यंत प्रभावी औषध होते. त्यांनी दिलेल्या ज्ञानाचा उपयोग करून असंख्य भक्त भवसागर तरून गेले आहेत व जन्ममरणाच्या चक्रातून मुक्त होऊन जीवनमुक्त झाले आहेत.

आध्यात्मिकदृष्ट्या सद्‌गुरुची नैतिक, शारीरिक, साक्षात्कारी आणि सामाजिक अशी चार प्रमुख लक्षणे असतात. साईबाबा ह्या चारही लक्षणांनी संपन्न असल्यामुळे ते परिपूर्ण सद्‌गुरु होते. सद्‌गुरु साईबाबांचे नैतिक लक्षण म्हणजे ते सदैव आनंदी व प्रसन्न असायचे. सुस्ती, कंटाळा, आळस, उपेक्षा, हयगय, असंतोष त्यांच्या मनात नव्हताच. सद्‌गुरु साईबाबांचे शारीरिक लक्षण म्हणजे त्यांनी आपली सर्व





कर्मेंद्रिये, ज्ञानेंद्रिये सहजपणे, विनासायास आपल्या ताब्यात ठेवली होती. सद्‌गुरु साईबाबांचे साक्षात्कारी लक्षण म्हणजे त्यांना सर्व ठिकाणी, सर्वांमध्ये देवच दिसत असे. त्यांना आत जे रूप दिसायचे तेच बाहेरदेखील दिसत असे. सद्‌गुरु साईबाबांचे सामाजिक लक्षण म्हणजे ते समाजाभिमुख होते, ते लोकप्रिय, लोकप्रसिद्ध होते. सद्‌गुरु असल्यामुळेच साईबाबा पर्वताप्रमाणे निश्चल होते, धरतीप्रमाणे सर्वांचे भारवाहक होते, पाण्याप्रमाणे ते सर्वांशी मृदुलतेने वागत, सागराप्रमाणे सदा निरहंकार होते आणि वायुप्रमाणे भेदातीत होते. सद्‌गुरु साईबाबांकडे आकाशाचे क्षमत्व, असंगत्व आणि निर्ममत्व होते. सूर्याप्रमाणे ते निरासक्त आणि अलिप्त होते. वृक्षाप्रमाणे ते सर्वांगाने, सर्व भावाने, सर्वांशी, सर्वकाळी, सर्वस्थळी लीन व नम्र होते. साईबाबांची सद्‌गुरु म्हणून आणखी काही लक्षणे म्हणजे ते ज्ञानी असून निराभिमानी होते. त्यांचे विचार निष्काम होते, त्यांच्या अंगी निश्चयाचे बळ होते, ते वैराग्यशील होते. ते परमार्थ विवरण करण्यात कुशल होते. ते सतत जगदउद्धाराचाच विचार करीत असत. सद्‌गुरु असल्यामुळे साईबाबा नवविधा भक्ती प्रविण होते. ते नीति, न्याय, मर्यादांचे काटेकोरपणे पालन करीत असत. ते सद्‌गुरुची सर्व तात्विक आणि नैतिक ही दोन्ही प्रमुख कर्तव्ये पार पाडीत असत. सद्‌गुरु साईबाबा आपल्या भक्तांची नैतिक, बौद्धिक आणि आध्यात्मिक प्रगती घडवून आणीत असत. परंतु त्यांना त्यांच्या बदल्यात भक्तांकडून लौकिक-भौतिक स्वरुपाचे काही मिळावे असे कधीही अपेक्षित नव्हते. सद्‌गुरु असल्यामुळेच साईबाबा अष्टांग योगातील यम ह्या अंगाच्या अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह ह्या पाचही उपांगांचे पालन करीत असत. तसेच नियम ह्या अंगाच्या शौच (शरीर व मन शुद्ध करणे), संतोष, तप, स्वाध्याय, ईश्वर प्राणिधान ह्या सर्व उपांगांचे पालन करीत असत. आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान व समाधि ह्या अष्टांग योगाच्या प्रकारांचेदेखील साईबाबा पालन करीत असत. सद्‌गुरु साईबाबांकडे असलेल्या ब्रह्मशक्तीचे कार्य त्यांच्या मानवी देहातून व जिवातून अव्याहतपणे चालत असे. भक्त सदाचारी असो वा दुराचारी, त्याचे कल्याण करणे एवढेच खऱ्या सद्‌गुरुला माहीत असते. म्हणूनच सद्‌गुरु साईबाबा त्यांच्या दरबारात येणाऱ्या प्रत्येकाचे कल्याण करीत असत. सद्‌गुरु साईबाबांचे एक खास वैशिष्ट्य म्हणजे ते शास्त्र, नियमांचे कधीही अतिरेकी किंवा अतिवादीपणे पालन करीत नसत. तसेच आपले भक्त जर एखाद्या शास्त्र-नियमांवर, एखाद्या ग्रंथातील तत्वज्ञानावर शब्दचिकित्सा करीत बसले, शाब्दिक वाद घालीत बसले तर सद्‌गुरु साईबाबा त्यांना योग्य तो तत्वबोध करीत असत.

भारतीय गुरु-शिष्य परंपरेनुसार शिष्याने आपल्या गुरुला त्याने दिलेल्या ज्ञानाबद्दल, त्याने केलेल्या संस्काराबद्दल आदर व्यक्त करण्यासाठी, समर्पणाची भावना व्यक्त करण्यासाठी, कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी गुरुदक्षिणा द्यायची असते आणि गुरुनेदेखील भक्ताने दिलेली गुरुदक्षिणा समाधानाने स्वीकारायची असते. सद्‌गुरु साईबाबा आणि त्यांचे भक्त ह्या गुरु-शिष्य परंपरेनुसारच वागत असत. सद्‌गुरु साईबाबा भक्तांनी द्रव्य, तसेच वस्तूंच्या रुपात दिलेली गुरुदक्षिणा स्वीकारीत असत. परंतु भक्तांनी आपले शरीर, वाणी व मन ह्या स्वरुपात अर्पण केलेली दक्षिणा साईबाबांच्या दृष्टीने अधिक महत्त्वाची होती. साईभक्त दासगणू, दाभोलकर, नानासाहेब दीक्षित, नानासाहेब चांदोरकर, बायजाबाई, राधाकृष्णाबाई, माधवराव देशपांडे, म्हाळसापती ह्या आणि इतर अगणित भक्तांनी साईबाबांना वरील स्वरुपातच दक्षिणा अर्पण केली होती. साईबाबांना वर उलेख केलेली त्रीकरण दक्षिणा अर्पण केल्यामुळेच ह्या भक्तांचे त्यांच्या शरीरावरील, वाणीवरील आणि मनावरील स्वामित्व संपले होते. म्हणूनच हे भक्त कधीही स्वतःसाठी त्यांच्या शरीराचा, वाणीचा व मनाचा वापर करीत नसत. आपले शरीर ते सद्‌गुरु साईबाबांच्या सेवेसाठी झिजवीत असत. आपली वाणी ते, साईनामस्मरणासाठी साईगुणगानासाठी वापरीत असत आणि आपले मन साईबाबांवर स्थिर ठेवून त्यांचे चिंतन, त्यांचे ध्यान, त्यांची मानसपूजा करीत असत. आपल्या मनमंदिरात साईबाबांची प्रतीष्ठापनाच ह्या सर्व अनन्य साईभक्तांनी केली होती. त्यांच्या मनात साईबाबा सोडून इतर विषयांच्या विचारांना थाराच नव्हता. ते खऱ्या अर्थाने साईमय झाले होते.

सद्‌गुरु साईबाबा कधी कधी आपल्या भक्तांकडून द्रव्यरुपात दक्षिणा मागून घेत असत. भक्तांकडून द्रव्यरुपात दक्षिणा मागून घेण्यामागील साईबाबांचा उद्देश होता भक्ताच्या मनात मोह, माया, आसक्ती, लोभ अजून किती